Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क
२/२०२१

**विषय -** **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१**

**संदर्भ -** राज्य निडणूक आयोग, महाराष्ट्र क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८ दि.४/०१/२०२१

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व कर्मचारी यांना उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.१५/०१/२०२१ व दि.२०/०१/२०२१ रोजी मतदान होणार आहे. संबधित निवडणूक क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासाची विशेष सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार विद्यापीठातील ज्या शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सदर दिवशी मतदान करणार आहेत /केलेले आहे, त्यांनी लेखी अर्जाव्दारे विभागप्रमुख यांचेमार्फत आस्थापना विभागास अवगत करावे.

उपकुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 234

**दि.** 14 JAN 2021

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

निवडणूक प्राथम्य

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०४/०१/२०२१

प्रति,
मा. प्रधान सचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

**विषय:- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१.**
राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि. १५/०१/२०२१ व दि. २०/०१/२०२१ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करणे/सवलत देण्याबाबत.

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि. ११/१२/२०२० व दि. १६/१२/२०२० रोजीचे निवडणूक कार्यक्रमाबाबतचे आदेश.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने उक्त संदर्भीय आदेशांद्वारे (प्रती संलग्न) राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये शुक्रवार दिनांक १५/०१/२०२१ रोजी मतदान होणार आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी, मुलचेरा, अहेरी, एटापल्ली, भामरागड व सिरोंचा या सहा तालुक्यांमध्ये बुधवार दिनांक २०/०१/२०२१ रोजी मतदान होणार आहे.

२. उपरोक्त ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच सर्व दक्षता व काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

३. तसेच ग्रामपंचायतींच्या निवडणुका या अत्यंत चुरशीच्या लढविल्या जात असून अल्प मताने उमेदवार विजयी होत असतात.

४. वरील कार्यक्रमांतर्गत सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींपैकी नागरी क्षेत्राच्या (विशेषत: महानगरपालिका क्षेत्राच्या) लगतच्या मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये राहणारे बहुतांश मतदार हे कामधंद्याकरीता नागरी क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमाच्या आस्थापना, दुकाने, औद्योगिक

आस्थापना (MIDC) इत्यादी ठिकाणी ये-जा करीत असल्याने अशा मतदारांना उक्त मतदानाच्या दिनांकास मतदान करता यावे यासाठी विशेष रजा दिल्यास, निवडणुक मतदानाची टक्केवारी निश्चितपणे वाढू शकेल. ही वस्तुस्थिती लक्षात घेता राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

अ) उपरोक्त निवडणूक कार्यक्रमानुसार **संबंधित निवडणूक क्षेत्रातील** सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना यामधील कामगारांना मतदानाच्या दिवशी (दि. १५/०१/२०२१ व दि. २०/०१/२०२१) मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करावी.

ब) निवडणूक होणाऱ्या ज्या ग्रामपंचायतींच्या लगतच्या क्षेत्रात औद्योगिक वसाहती (MIDC) तसेच महानगरपालिकेसारख्या मोठ्या नागरी वसाहती वसलेल्या आहेत, अशा ठिकाणी नोकरी निमित्ताने **कामास येणाऱ्या संबंधित ग्रामपंचायतींमधील मतदारांना** मतदानाचा हक्क बजावता यावा याद्दष्टीने अशा मतदारांना उक्त नमूद केलेल्या मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी / विशेष सवलत देण्यात यावी.

क) **शहरी भागात किंवा निवडणुका नसलेल्या भागातील दुकाने/कंपन्या/वाणिज्यीक आस्थापना बंद ठेवण्याची आवश्यकता नाही.**

५. उपरोक्त आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर योग्य ती अधिसूचना/परिपत्रक निर्गमित करण्यात याव्यात. आपले परिपत्रकामध्ये "आयोगाच्या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल" असे स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

६. या आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीची सर्व जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार.

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) यांना माहितीस्तव.

**दि.१५ जानेवारी, २०२१ व दि. २० जानेवारी, २०२१ रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक: मतदान २०२१/प्र.क्र.०६/कामगार-९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १३ जानेवारी, २०२१.

**संदर्भ** :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.०१/का.८, दि.११ डिसेंबर,२०२० व दि.१६ डिसेंबर,२०२० रोजीचे पत्र.

**शासन परिपत्रक**

आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व लोकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये १०० टक्के मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा,१९५१ च्या परिच्छेद १३५ब नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/ आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि. ११ डिसेंबर, २०२० रोजी सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दि.१६ डिसेंबर, २०२० रोजी सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे. सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा.खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व

परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी/व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.०१/का.८ दि.११ डिसेंबर, २०२० व दि. १६ डिसेंबर,२०२० रोजीच्या पत्रास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०११३१६२१४४३९१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHASHANK MADHAV SATHE
Date: 2021.01.13 16:24:50 +05'30'

**(श.मा.साठे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-** उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
५. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई, (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
६. आयुक्त, अमरावती, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, जालना, हिंगोली, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा, नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, महाराष्ट्र राज्य.
७. जिल्हाधिकारी, अमरावती, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, जालना, हिंगोली, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा, नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, महाराष्ट्र राज्य.

८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

९. कामगार विभागातील सर्व कार्यासने

**प्रत माहितीसाठी :**

१ मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

२ मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

३ मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

## परिशिष्ट-१

## राज्यातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका दि. १५/०१/२०२१.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | कोकण | ठाणे | १५८ |
| २. | | पालघर | ०३ |
| ३. | | रायगड | ८८ |
| ४. | | रत्नागिरी | ४७९ |
| ५. | | सिंधुदुर्ग | ७० |
| ६. | नाशिक | नाशिक | ६२१ |
| ७. | | धुळे | २१८ |
| ८. | | जळगाव | ७८३ |
| ९. | | अहमदनगर | ७६७ |
| १०. | | नंदुरबार | ८७ |
| ११. | पुणे | पुणे | ७४८ |
| १२. | | सोलापूर | ६५८ |
| १३. | | सातारा | ८७९ |
| १४. | | सांगली | १५२ |
| १५. | | कोल्हापूर | ४३३ |
| १६. | औरंगाबाद | औरंगाबाद | ६१८ |
| १७. | औरंगाबाद | बीड | १२९ |
| १८. | | नांदेड | १०१५ |
| १९. | | उस्मानाबाद | ४२८ |
| २०. | | परभणी | ५६६ |
| २१. | | जालना | ४७५ |
| २२. | | लातूर | ४०८ |
| २३. | | हिंगोली | ४९५ |
| २४. | अमरावती | अमरावती | ५५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | | अकोला | २२५ |
| २६. | | यवतमाळ | ९८० |
| २७. | | वाशीम | १६३ |
| २८. | | बुलडाणा | ५२७ |
| २९. | नागपूर | नागपूर | १३० |
| ३०. | | वर्धा | ५० |
| ३१. | | चंद्रपूर | ६२९ |
| ३२. | | भंडारा | १४८ |
| ३३. | | गोंदिया | १८९ |
| ३४. | | गडचिरोली (कोरची, कुरखेडा, देसाईगंज, आरमोरी, गडचिरोली व धानोरा) | १९९ |

**परिशिष्ट-२**

**राज्यातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका दि. २०/०१/२०२१.**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणुकीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | चामोर्शी | २०/०१/२०२१ |
| २ | | मुलचेरा | |
| ३ | | अहेरी | |
| ४ | | एटापल्ली | |
| ५ | | भामरागड | |
| ६ | | सिरोंचा | |